लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : शनिवार – ३० सप्टेंबर २०२३
वर्ष – ३७ वे
अंक – १७५
पाने – ४
किंमत २ रूपये
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com



लातूर - नाशिक
दररोज
रात्री ८.३० वाजता
GET IT ON Google Play
VISHWA TRAVELS APP
विश्व ट्रॅव्हल्स
२, उद्योग भवन कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, लातूर.
संपर्क : (02382) 242790, 254002, 249329, 88888 45403, 88888 45404.
जिथं प्रवासाची व्याख्याच बदलते
Online Booking : www.vishwatravels.in


## संपादकीय......

### मानवंदना सोपस्कार ठरू नये

अन्याय, अत्याचार, अनागोंदी, भ्रष्टाचार, अनिष्ठ रूढी-परंपरांना धक्के देण्यासाठी अर्थात आवाज उठविण्यासाठी आम्ही १४ मार्च १९८७ ला दै. भूकंप, लातूर येथून चालू केले. पण, ३० सप्टेबर १९९३ ला पहाटे ३.५६ वा. किल्लारी व परिसरात विनाशकारी भूकंप झाला. हा भूकंप लातुरातील भाड्याने राहत असलेल्या आंबेडकर चौकातील घरी पूर्णपणे अनुभवला, आकाशवाणी वरील ७.०५ च्या बातम्या ऐकल्या आणि जमेल त्या वाहनाने किल्लारी गाठली. सकाळी साडेआठ, पावणे नऊच्या सुमारास किल्लारीत पोहचलो. ज्या किल्लारीत ३० सप्टेबरच्या अगोदर जवळपास प्रत्येक घरी गेलेलो होतो ती किल्लारी पत्त्याचा बंगला कोसळावा तशी भूईसपाट झाली होती. पिढ्यान-पिढ्या लोक ज्या घराच्या आश्रयाला राहून लहानाची मोठी झाली त्याखाली अख्खी कुटुंबच्या कुटुंबं गाढली गेली. भूकंपाने लातूर जिल्ह्यात ७९२८ जणांचा बळी गेला अशी शासन दरबारी नोंद आहे. अनेकांची प्रेतच मिळाली नाहीत. हजारो जखमी झाले. तो दिवस किल्लारी परिसरातील गावकरी 'काळा दिवस' म्हणून साजरा करतात. त्या घटनेला आज तीन दशक झाली आहेत. भूकंपात मृत्यू पावलेल्या मृतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

सहकारी साखर कारखाना, द्राक्षामुळे किल्लारी परिसर प्रसिद्ध होता. कॉ. माणिक जाधव हे जिल्हा परिषदेच्या राजकारणात सक्रिय होते. ३० सप्टेबर ९३ च्या अगोदर किल्लारी व परिसरात भूगर्भातून आवाज यायचे. प्रत्येक आवाजानंतर लोक भयभीत व्हायचे. कॉ. माणिक जाधव यांच्या सोबत आवाज व छोट्या-मोठ्या धक्क्याने जमीन-घराला गेलेले तडे या गावात आम्ही पाहिले. त्यावेळी शासनाकडे अनेकवेळा निवेदनही देण्यात आली. पण, शासनाने गांभिर्याने घेतले नाही. उलट लातूरचे तत्कालीन पालकमंत्री विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत किल्लारीच्या श्री निळकंठेश्वर मंदिरात बैठक झाली. या बैठकी दरम्यान जमिनीखालून काहीतरी घरंगळत जावे तसा आवाज झाला होता, तेंव्हा विलासराव म्हणाले होते. घाबरू नका! 'मी आलो आता भूकंप येणार नाही' पण, ३० सप्टेबर रोजी पहाटे ३.५६ वा. भूकंपाचा तीव्र झटका बसला, किल्लारी, सास्तूर परिसराचा 'नकाशा'च बदलला. भूकंपाचा धक्का जाणवताच राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार काही मिनीटातच लातूरला पोहचले, परिस्थितीचे गांभीर्य पाहून त्यांनी प्रशासनाला कामाला लावले, आसपासच्या अधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या दिल्या. घरांच्या मलब्याखाली गाढले गेलेल्यांना बाहेर काढणे, जखमींना उपचार, त्यांच्या खाणे-पिणे तात्पूरत्या निवाराची सोय, हजारोंच्या संख्येने जे मरण पावले त्यांचेवर अंत्यसंस्कार, विनाशकारी भूकंपानंतर केलेले मदतीचे आवाहन, आलेल्या मदतीचे समान वाटप करण्याचा प्रयत्न केला. एखादी आपत्ती आल्यानंतर मायबाप सरकार म्हणून जनतेला कृतीतून कसा धीर द्यावा हे 'शरद पवार' यांनी दाखवून दिले. आज शरद पवार यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता सोहळा होत आहे. त्या आयोजकांचे अभिनंदन. ३० सप्टेबर ९३ रोजी झालेल्या विनाशकारी भूकंपाला आज तीस वर्षे पूर्ण झाली. आजही तो दिवस डोळ्यासमोर आणला तर अंगावर काटे येतात, आजही भूकंपग्रस्त भागातील लोक आपले प्रश्न घेऊन माध्यमाकडे येतात तेंव्हा आणखी किती वर्षे त्यांच्या समस्या मिटायला लागतील हे कोडेच वाटते. पुन्हा-पुन्हा तक्रारी करणारे भूकंपग्रस्त प्रशासनाकडे, शासनाकडे जातात तेंव्हा त्यांच्यासाठी हे रोजचं होऊन गेलं आहे. भूकंपाने किल्लारी व परिसरातील 'गावपण' हरवलं आता तिथे कॉलन्या झाल्या आहेत. पूर्वी गाव म्हटले कि एकमुखी रस्ता, एकमेकांना लागून घरे, चावडी, पार, मोठे झाड, मंदिर, शेजारच्या घरात थोडा जरी आवाज झाला की लोक शेजारधर्म म्हणून धावून जायचे, गावात चार-दोन ज्येष्ठ नागरिक असायचे ते व्यसन, अनिष्ठ बाबी रोखण्याचा प्रयत्न करायचे पण आज 'कॉलनी पॅटर्न'मध्ये गावपण हरवलं आहे. भूकंपानंतर या परिसरात मोठ्या संख्येने 'एनजीओ' आल्या कोट्यावधी रूपयाचा निधी खर्च करून त्यांनी भूकंपग्रस्ताचे मानसिक मनोबल वाढले का? तर याबाबत प्रश्नचिन्हच ठरते. ६.४ तिव्रतेचा भूकंप झाला, पण आपल्या साध्या, मातीच्या-दगडाच्या बांधकामामुळे घरे पडून अधिक जिवीत हानी झाली. त्यानंतर आपण या परिसरात जिल्ह्यात 'भूकंपरोधक' घरे बांधली जात आहेत का ते पहात नाही. आजही या परिसरात सोयी-सुविधा नाहीत. शेजारच्या काही गावांचे पुनर्वसन नाही, अनेकांना घरे मिळाले नाहीत. भूकंपग्रस्तांना आरक्षण द्यायला हवे. भूकंपग्रस्त म्हणून गरजूपेक्षा ईतर लोक बनावटगिरी करित आहेत. या भागातील प्रसिद्ध अशा द्राक्ष निर्यातदारांना आधार नाही, या परिसरात पुन्हा अशी आपत्ती आली तर जागरूक कसे राहू याचे प्रशिक्षण नाही. किल्लारीच्या भूकंपानंतर जगभरातून मदत आली व तशी मदत संकटात सापडलेल्यांना करण्याची दानत आपल्यात यायला हवी, ती आली का? किल्लारी व परिसरातील जे गावकरी मरण पावले त्यांचे स्मारक म्हणून एका गावात भूकंपाअगोदरची गावे व भूकंप झाल्यानंतरची स्थिती याचे संग्रहालय, मार्गदर्शन अशा पद्धतीने सुसज्ज अशी चित्रप्रदर्शने माहिती देण्याचे केंद्र उभारले जायला पाहिजे. संकटावर मात करून एकजुटीने उभे राहण्याची गरज आहे. भूकंपानंतर मदतीला धावून येणारे, मदत घेणारे, एका धक्क्याने सर्वांना समान पातळीवर आणले, सरकारने प्रयत्न केले, काही एनजीओंनी प्रामाणीकपणे काम केले. त्या प्रत्येकाने धडा घेण्याची, काहितरी शिकण्याची गरज आहे. खरे तर भूकंपाला आज ३० वर्षे झाले. या ३० वर्षात या परिसराकडे विशेष लक्ष देऊन नैसर्गीक आपत्तीत जगाला मार्गदर्शक ठरेल असे मॉडेल म्हणून विकसीत करायला हवा होता. पण, तसे काही उभा करता आले नाही. हे प्रशासनाचे अपयशच आहे. शासन मदत करते. पण, आपण देखील शासकीय मदत घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ईच्छाशक्ती आपल्यात निर्माण व्हावी. दरवर्षी ३० सप्टेबर परिसरात काळा दिवस पाळला जातो, आज ३० वा काळा दिवस पाळतोय मृतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करतोय, हे सोपस्कार ठरू नये. किल्लारीच्या भूकंपात मृत्यू पावलेल्या मृतात्म्यांना भावपूर्ण आदरांजली.



# संकट मोठं होतं, धैर्याने तोंड दिलं
# कृतज्ञता दानशूरांची माना-शरद पवार

**किल्लारी : लातूर-धाराशिव या जिल्ह्यात तीस वर्षांपुर्वी झालेला भूकंप विनाशकारी होता. त्यात हजारो निष्पापांचा बळी गेला. कोट्यावधीचे नुकसान णाले. हे संकट मोठं होतं पण धैर्याने तोंड दिलं, या कामी देश-विदेशातील अनेकांनी मदत केली. त्यांच्याविषयी कृतज्ञता बाळगू या असे मत ज्येष्ठ नेते भूकंप झाला त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी व्यक्त केली.**

आज किल्लारी परिसरात झालेल्या भूकंपाला तीस वर्षे झाली. त्या निमित्ताने काही तरूणांनी एकत्र येऊन भूकंपावेळी मुख्यमंत्री म्हणून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल शरद पवार यांच्या कृतज्ञता सोहळा किल्लारीत आयोजीत केला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री दिलीपराव देशमुख हे होते. कृतज्ञता सोहळ्यास उत्तर देत असताना शरद पवार यांनी भूकंपाच्या संकटकाळी या भागातील जनता खंबीर राहिली. प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी, दानशूर, स्वयंसेवी संस्था, उद्योजक यांनी भरीव मदत केली. त्यातून भूकंपात उध्वस्त झालेल्या गावांचे पुनर्वसन करता आले. घरे बांधून देता आली अशा व्यक्तीबद्दल कृतज्ञता बाळगायला हवी, असे मत व्यक्त केले.

किल्लारीचा भूकंपात आलेला अनुभव शासनात काम करित असतानाच्या अनुभवाचा फायदा, ईतर नैसर्गीक आपत्तीत आला. पुर्ण उध्वस्त झालेली ५२ गावे, अंशतः नुकसान झालेली अनेक गावांचे पुनर्वसन करण्यासाठी पैशाची गरज होती. तेंव्हा देशाचे अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी मदत केली, असे मत व्यक्त करून किल्लारीत भूकंप झाला, दुसरे-तिसरे दिवशी मी सोलापूरहून येत असताना रस्त्याच्या कडेला एका बैलगाडीत एक जण झोपला होता, मदतीसाठी त्याला उठविले, तेंव्हा तो गावकरी नव्हे तर लातूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी प्रविण परदेशी होते. ते काम करून तशा अवस्थेत झोपले होते, हा अनुभव सांगितला.

### मंत्री बनसोडे यांचे नावच घेतले नाही

शरद पवार यांनी भाषणाच्यावेळी मंचावरील काहिंची नावे घेतली. पण, राज्याचे क्रीडा मंत्री ना. संजय बनसोडे यांचे नावच घेतले नाही. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मात्र त्यांचा उल्लेख पालकमंत्री असा केला.

सक्षणा सलगर, ॲड. राहुल मातोळकर, अमर बिराजदार आदिंनी हा कार्यक्रम घेतला होता. कार्यक्रमास खा. सुप्रिया सुळे, खा. ओमराजे निंबाळकर, माजी मंत्री बसवराज पाटील, मधुकरराव चव्हाण, डॉ. गोपाळराव पाटील, शांतीलाल मुथा, विठ्ठल मणियार, राजेश टोपे, पृथ्वीराज साठे, आ. राहुल साठे, दिनकर माने, आ. कैलास पाटील आदी उपस्थित होते.

### आज भूकंपाला ३० वर्षे झाली

भूकंप झाला त्या दिवशीचा ३० सप्टेबर १९९३ चा सांज दै. भूकंपचा अंक, दुसरे दिवशीचा त्यावेळचा अग्रलेख, तिसरे दिवशीचा अंक आजच्या पान २ व ३ वर देत आहोत.

**-व्यवस्थापक**
सांज दै. भूकंप, लातूर

## किल्लारी भूकंपात बळी पडलेल्यांच्या स्मृतीला विधान परिषद उपसभापती निलमताई गोऱ्हे यांनी वाहिली श्रद्धांजली

लातूर : लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात ३० सप्टेंबर १९९३ ला झालेल्या भूकंपात हजारो लोकं मरण पावले. त्या दुःखद घटनेला आज तीस वर्ष पूर्ण झाले, त्यासर्वांप्रती संवेदना व्यक्त करून विधान परिषदेच्या उपसभापती निलमताई गोऱ्हे यांनी किल्लारी येथील स्मृती स्तंभाला पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली वाहिली. यावेळी आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांच्यासह अधिकारी यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

### फुलपाखरू उद्यानाचे लोकार्पण

ज्या ठिकाणी भूकंप झाला ते निर्मनुष्य किल्लारी गाव वन विभागाकडे दिले आहे.वन विभागाने तिथे पूर्वीच नक्षत्र उद्यान उभं केलं आहे. आज उपसभापती निलमताई गोऱ्हे यांच्या हस्ते फुलपाखरू उद्यानाचे लोकार्पण करण्यात आले. हे फुलपाखरू उद्यान एक एकर एवढ्या क्षेत्रावर करण्यात आले आहे. या लोकार्पणावेळी आ. अभिमन्यू पवार, वन विभागाच्या उपविभागीय वन अधिकारी श्रीमती तांबे, औसा तहसीलदार भारत सूर्यवंशी, सहायक वन अधिकारी सचिन रामपुरे उपस्थित होते.



## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. प्रकाश महानवर यांची नियुक्ती



सोलापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. प्रकाश अण्णा महानवर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल तथा राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांचे कुलपती रमेश बैस यांनी डॉ. प्रकाश महानवर यांची नियुक्ती केली. डॉ. प्रकाश महानवर सध्या मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेत वरिष्ठ प्राध्यापक व संचालक पदावर कार्यरत आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस यांचा कार्यकाळ ५ मे २०२३ रोजी संपल्यामुळे सदर पद रिक्त झाले होते. त्यानंतर डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. रजनीश कामत यांच्याकडे सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदाच्या नियुक्तीसाठी राज्यपालांनी आयआयटी कानपूरचे माजी संचालक डॉ. संजय धांदे यांच्या अध्यक्षतेखाली कुलगुरु निवड समिती गठीत केली होती. विश्र्वेश्र्वरैय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेचे संचालक प्रमोद पडोळे, हैद्राबाद येथील इंग्रजी व परकीय भाषा विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. ई. सुरेशकुमार (युजीसी प्रतिनिधी) व राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी हे समितीचे सदस्य होते. समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्यानंतर राज्यपालांनी यांनी डॉ. प्रकाश महानवर यांची कुलगुरुपदी नियुक्ती जाहीर केली आहे.

## विठ्ठलरूक्मीणी नगर भागात घरफोडी दीड लाखाचा ऐवज लंपास

लातूर : शहरातील विठ्ठलरूक्मीणी नगर येथील एका घरात ठेवलेल्या दिवानामधील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण दीड लाख रूपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला आहे.

नागनाथ ज्योतीराम फुले यांचे विठ्ठलरूक्मीणी नगर परिसरात घर आहे. त्यांच्या आईच्या रूममध्ये असलेल्या दिवानमध्ये ठेवण्यात आलेल्या चार तोळे वजनाच्या १ लाख ३५ हजार रूपये किंमतीच्या पाटल्या व रोख रक्कम २१ हजार ५०० रूपये असे एकूण १ लाख ५६ हजार ५०० रूपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला आहे. या प्रकरणी नागनाथ फुले यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अंबादास दानवे मराठा तरीही त्यांच्याकडे OBC प्रमाणपत्र; विजय वडेट्टीवारांचा दावा

नागपूर : सरकारकडून सरसकट ओबीसी प्रमाणपत्र वाटण्याचे काम सुरू आहे. ओबीसी आरक्षणाच्या बैठकीत सरकारकडून तोंडाला पाने पुसण्याचे काम झाले. जे सांगतायेत ओबीसी आरक्षणाचा वाटा कुणाला देणार नाहीत म्हणतात, ओबीसी प्रमाणपत्रे देणार नाही म्हणतायेत. परंतु राज्याचे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवेमराठा आहेत. त्यांनी ओबीसी प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्रही घेतलंय असा दावा विजय वडेट्टीवार यांनी केला.

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, आतापर्यंत मराठवाड्यात २८ लाख लोकांना पैसे घेऊन जात प्रमाणपत्र देत जात वैधता प्रमाणपत्रेही देण्यात आली. हे काम झपाट्याने सुरू आहे. गुपचूपपणे सरसकट ओबीसी प्रमाणपत्र वाटण्याचे काम सुरू आहे. मग आरक्षणाचा आणि बैठकीचे सोंग सरकार कशाला करतंय याचे उत्तर ओबीसी समाजाने विचारले पाहिजे असं त्यांनी सांगितले.

तसेच आरक्षण संपवण्याची पहिली पायरी यशस्वीपणे पार पाडत आहे. कारण शिपायापासून अधिकाऱ्यांपर्यंत सर्व पदे या सरकारने कंत्राटीपद्धतीने भरण्याचा निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे मंत्रालयातील कक्ष अधिकारीही मनुवादी विचाराचे बसलेले दिसतील. विशिष्ट विचारधारेचे लोक तहसिल कार्यालयात तहसिलदार म्हणून बसतील. संपूर्ण मेरिट डावलून मर्जीतील लोकांना बसवले जाईल. हा संपूर्ण खेळ राज्यात सुरू आहे हे आमच्या ओबीसी नेत्यांना का कळत नाही हा खरा प्रश्न आहे सरकारने काढलेल्या कंत्राटी भरतीच्या जीआरची होळी तरुणांनी करावी असं आवाहनही विजय वडेट्टीवार यांनी केले.

मी कुठलेही जात प्रमाणपत्र घेतले नाही, त्यामुळे जात वैधतेचा संबंध येत नाही. विजय वडेट्टीवार यांनी का आरोप केले त्यांना विचारा. ज्यांच्याकडे वंशावळी, नातेवाईकांचे रेकॉर्ड त्यांना ओबीसी प्रमाणपत्र दिलं जातेय. वंशावळीचे प्रमाण असेल तर सर्टिफिकेट मिळते. माझ्याकडे कुठलेही प्रमाणपत्र नाही. मी कुठल्या समाजाचा नेता नाही. मी शिवसेनेचा नेता आहे. मी मराठा, मी ओबीसी असं म्हणणार नाही. माझी जात माझ्याकडे राहील मी सार्वजनिक का करेन. ज्या बातमीत दम नाही त्याला जाब का विचारू असा सवाल करत अंबादास दानवे यांनी विजय वडेट्टीवारांचा आरोप फेटाळून लावला.

दरम्यान, मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही मागणी चुकीची नाही. परंतु कुठल्याही आरक्षणाला धक्का न लागता हे आरक्षण मिळावे. आरक्षणाची मर्यादा वाढवावी लागेल. कुणबी आणि मराठा फरक आहे. माझ्याकडे पावणे चारशे वर्षापूर्वीचे वंशावळीचे पुरावे आहेत. परंतु मी प्रमाणपत्र घेतलेले नाही. माझ्या ७ पिढ्यांचे रेकॉर्ड आहेत. मला प्रमाणपत्राची गरज नाही. मी खुल्या प्रवर्गातून निवडणुका लढल्या आहेत. मला जातीच्या प्रमाणपत्राची गरज नाही असंही अंबादास दानवे यांनी म्हटलं.



दैनिक भूकंप

निसर्गाने डाव साधला पण ...
अधिक दक्षता घेतली असती तर!



किल्लारी प्रेताचे तांडव : भूकंपचा पुन्हा धक्का!

सुपर फॉईन
वाशन अन्ड डायक्लनर्स, लातूर
स्पेशालिस्ट : साडी, पजाबी ड्रेस अदि
Asic for Aurgent
फोन : ४६५६

दैनिक भूकंप

कमी दरात मजबूत बांधकाम
विशाल सिमेंट प्रॉडक्टस्
एम. आय. डी. सी. प्लॉट नं. बी ४१ लातूर
सिमेंट, विटा, सिमेंट जाळी, हुंली ब्लॉक, सिमेंट पाळ कुंड्या, सिमेंट नाळी अविचे विक्रते
प्रो. व्यंकटराव जाधव

वर्ष : ७ अंक : १६८ शनिवार २ ऑक्टोबर १९९३ संपादक-अशोक चिचोळे पाने २ किमत ५० पैसे ओ. एस. डी. २२

किल्लारी भूकंप परिस्थीती सांभळणेची जबाबदारी मी व्यावस्थीत पार पाडीन

डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर

मुख्यमंत्री मोईलीची अचानिक भेट

भूकंपग्रस्त पाहणीसाठी पंतप्रधान सोमवारी येणार

– मुख्यमंत्री ना. शरद पवार

रेल्वे मंत्र्याकडून भूकंपग्रताची, भागाची पहाणी

लातूर बाजारसमिती कडून भूकंपग्रस्तांना तीन गावें दत्तक

भूकंप धक्याने सिनेमा प्रेक्षकात एकच गोंधळ

चित्रपटगृहाचे एक दिवसाचे उत्पन्न भूकंपग्रस्तासाठी

लातूर न.प.ची एक लाख रुपयाची मदत

एम आय टी ची १.२० लक्ष रु मदत

किल्लारी दुर्घटना आठवडाभर दुःखवटा

जबाबदारी विषयी शका

बळीचा संख्या ४० हजार

भूकंपाचे वृत प्रथम भूकंपात

mahyco
शेतकऱ्यांच्या कसोटीस १००% उतरलेले - महिको संकरित सूर्यफूल बियाणे पेरून अधिक उत्पादन मिळवा
संकरीत सूर्यफूल बियाणे MSFH - 1/8
उपलब्धतेसाठी अधिकृत विक्रेत्याकडे मागणी करा
वितरक संजय फर्टिलायझर्स

रंग संगीताचा सुरेख 'कॅच'
सर्वांच्या आवडीशी होत 'मॅच'
महेश क्लॉथ सेंटर
मेनरोड, मित्र नगर, लातूर
आमच्याकडे शूटींग, शर्टींग, साड्या तसेच ड्रेस मटेरील मिळेल. आपल्या सवडीची 'आवड' इथेच !
प्रो. गोरोबा साठे खाडगांवकर

## ३० सप्टेंबर १९९३ रोजीच्या भूकंपानंतर १ ऑक्टोबर १९९३ च्या सांज दैनीक भूकंपातील अग्रलेख

## निसर्गाने डाव साधला पण... आधीच दक्षता घेतली असती तर!

कोणताही अंदाज अगर पूर्वसूचना न मिळता एखादी दुर्घटना घडली तर त्यापुढे कोणाचेच काही चालत नाही, पण धोक्याची शक्यता एक वर्षापासून निसर्ग देत असताना प्रशासनाने कोणतीही जबाबदारी घेतली नाही आणि किल्लारी च्या भूकंपाने दुर्घटनेतील जागतिक उच्चांक निर्माण केला. एक नव्हे सुमारे १०० सव्वाशे भूकंपाचे धक्के दहा अकरा महिन्यांपूर्वी पासून किल्लारीने सोचले होते. त्यावेळी वृत्तपत्रांनी त्याची योग्य दखल घेतली, विशेषता या गावचे सरपंच डॉ. शंकरराव पडसळगी हे वृत्तपत्र प्रतिनिधी आणि शासनास टाहो फोडून सांगत होते की साहेब एक तर किल्लारी गावचे संपूर्ण पुनर्वसन करा अन्यथा तुमची जी काही यंत्रणा आहे त्याद्वारे हे स्पष्ट करा की नेमका भूकंप काय आहे? त्यावेळी कोणातरी तज्ञाची एक तुकडी किल्लारी व परिसराला भेट देऊन गेली. त्यांनी असा निर्वाळा दिला की हा काही भूकंप नाही, या जमिनीतील अंतर्गत घडामोडी आहेत, भविष्यात मोठा धक्का बसण्याची काही शक्यता नसल्याचा अंदाज व्यक्त केला होता. भाभा अनुसंशोधन केंद्रातील भूगर्भतज्ञ डॉ. अरोरा यांनी देखील भविष्यात मोठा भूकंप होण्याची शक्यता नाही असा अंदाज व्यक्त केला होता. पण भूकंप मापकावर ६.८ एवढी नोंद म्हणजे तीव्र धक्का समजला जातो. असे असताना त्याचे पूर्वानुमान काढता आले नाही. एक वर्षापूर्वी शासनाने हा प्रकार गांभीर्याने घेतला असता आणि या भागातील खेड्यांचे पुनर्वसन करून भूकंपाची तज्ञ तुकडी, केंद्र येथे कार्यान्वित केले असते तरी हजारो व्यक्तीचे प्राण वाचविता आले असते, झालेली वित्तहानी टाळता आली असती. शासन आज जी मदत करण्यासाठी तत्परता दाखवत आहे कदाचित याच्या अर्धी तत्परता वर्षापूर्वी दाखवली असती तर अनर्थाची तीव्रता घटली असती. अशाही परिस्थितीत जिल्ह्यातील जी काही तोकडी मोकडी यंत्रणा आहे त्यांच्या साह्याने जिल्ह्यातील पोलीस, जिल्हा प्रशासनाने अत्यंत तत्परता दाखवून किल्लारीत मदत कार्य चालू केले. लातूर जिल्ह्यातील हजारो विद्यार्थी, स्वयंसेवक, डॉक्टर कोणाच्या आवाहानाची वाट न पाहता किल्लारीत धावून गेले.घटना समजताच शहरातून मदत केंद्र उघडले,लातूर शहर जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील देशातील तसेच जगातील अनेक देशाकडून भारतात कोणत्या प्रकारची मदत पाहिजे याची विचारणा होत आहे ही येणारी सारी मदत जखमी पर्यंत योग्य रीतीने पोहोचण्यासाठी नियोजन करावे,सदर दुर्घटना घडताच देशभरातून नेतेमंडळींची रांग किल्लारीकडे लागली पण त्यांच्या बंदोबस्त आणि सुरक्षेच्या उपाय योजनेत मदत कार्याकडे दुर्लक्ष होऊ नये याची दक्षता घ्यावी भूकंपाने हानी केवळ एकट्या किल्लारीतच झाली नाही तर सभोवतीची खेडी ही भूईसपाट झाली आहेत त्याच्याकडे मदतीचा ओघ वाढवावा. महाराष्ट्रातील कोयनेजवळ असलेला भूकंपाचा केंद्रबिंदू किल्लारीकडे वळला असल्याने किल्लारी परिसरात भूकंप तज्ञाची एक तुकडी यंत्रणेसह कायमस्वरूपी ठेवली तर या पुढील दुर्घटनापासून नागरिकांना बचाव करता येईल. शेवटी निसर्ग आहे, त्यापुढे कोणाचे चालत नाही शक्यतो खबरदारी घेऊन आपण भूकंपग्रस्तांच्या दुःखात सहभागी होऊ या.





